थोडक्यात

मराठी भाषा सक्तीच्या विरोधात आंदोलन

गोवन वार्ता ■ मुंबई : महाराष्ट्र शासनाने रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या घेतलेल्या निर्णयाविरोधात मुंबईतील चालकांच्या एका गटाने रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले आहे. या नियमाच्या विरोधात चालकांनी सोमवारपासून तीन दिवसांचा संप पुकारला असून, त्यामुळे सामान्य प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या बिगर-मराठी भाषिक चालकांच्या मते, या नवीन नियमामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असून मोठ्या प्रमाणावर दंड आकारला जाण्याची भीती वाढली आहे. ऑटो, टॅक्सी आणि कॅब चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या नियमाला या चालकांकडून प्रखर विरोध होत आहे. या संपात सहभागी झालेल्या अनेक चालकांचे वय ५५ ते ६० वर्षांच्या दरम्यान आहे. या वयात अचानक मराठी शिकणे अत्यंत कठीण असल्याचे या चालकांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी : अमेरिकेचा प्रस्तावित दौरा नाकारला

केंद्र सरकारने तेलंगणाच्या चार कोटी जनतेचा अपमान केला!

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

अमेरिकेच्या दौऱ्याला परवानगी नाकारून केंद्र सरकारने तेलंगणातील चार कोटी जनतेचा अपमान केला आहे, असा गंभीर आरोप तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी सोमवारी केला. केंद्राचे हे पाऊल तेलंगणाबाबतचा भेदभाव दर्शवणारे असून हा मुद्दा संसदेत उपस्थित केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने आपल्या प्रस्तावाचा राजकीय दृष्टिकोनातून तपासणी करून मंजुरी नाकारली आहे. जर या परदेश दौऱ्यात काहीही राजकीय नव्हते, तर इंग्लंड दौऱ्याला परवानगी का दिली आणि अमेरिकेच्या दौऱ्याला नकार का दिला, असा सवाल मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारला.

'व्हायब्रंट गुजरात २०४७' उपक्रमांतर्गत गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना १७ ते २४ ऑगस्टदरम्यान अमेरिका आणि कॅनडा दौऱ्याची परवानगी देण्यात आली होती. मग 'तेलंगणा रायझिंग २०४७' अंतर्गत आपल्या प्रस्तावित अमेरिकेच्या दौऱ्याला का नाकारण्यात आले, असा प्रश्नही रेड्डी यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री भूषवत असलेले पद आणि दौऱ्याचा उद्देश या दृष्टीने सादर केलेला कार्यक्रम योग्य नसल्याचे सांगत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने हा दौरा नाकारला होता.

का आयोजित केला होता अमेरिकेचा दौरा?



मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांचा हा प्रस्तावित दौरा हैदराबादला शिक्षण, नवोन्मेष आणि संशोधनाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यात त्यांना हार्वर्ड विद्यापीठ, एमआयटी आणि व्हर्जिनिया टेक यांसारख्या जगातील नामांकित संस्थांसोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करायचे होते.

परराष्ट्र मंत्रालयाचे स्पष्टीकरण : राजकीय मंजुरी देण्यापूर्वी मुख्यमंत्री आणि इतर मान्यवरांच्या परदेश दौऱ्यांचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून सखोल मूल्यांकन केले जाते. अशा प्रकरणांमध्ये प्रस्तावित कार्यक्रम हा संबंधित व्यक्तीचे पद आणि दौऱ्याच्या उद्देशाशी सुसंगत असणे आवश्यक असते. अमेरिकेच्या दौऱ्याच्या संदर्भात हा कार्यक्रम पदाशी सुसंगत आढळला नाही आणि त्यामुळेच ही मंजुरी नाकारण्यात आली, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

काय म्हणाले अब्राहम?

१ आयओसी-यूएसए उपाध्यक्ष जॉर्ज अब्राहम यांनी निर्णयावर प्रश्न उपस्थित करत हा त्रासदायक दुहेरी निकष असल्याचे म्हटले.

२ इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना अमेरिकेला जाण्याची परवानगी दिली जात असताना तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांशी वेगळी वागणूक का, असा सवाल त्यांनी केला.

३ राजकारणाच्या पलीकडे जाऊन देशाच्या आणि तरुणांच्या भवितव्याचा विचार करण्याची गरज असल्याचे अब्राहम यांनी नमूद केले.

अमरावतीतील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या एनआयसीयू वॉर्डात भीषण आग

तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू, सहा जखमी

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
अमरावती



आगीच्या कारणाचा शोध सुरू

आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. सध्या रुग्णालय प्रशासनाकडून या संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात येत आहे. या दुर्घटनेनंतर रुग्णालयांमधील नवजात बालकांची सुरक्षा आणि अग्निशमन व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दोषींवर कठोर कारवाईची मागणी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार पक्ष) खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ही केवळ एक दुर्घटना नसून व्यवस्थेच्या निष्काळजीपणाचे उदाहरण आहे, असे मत त्यांनी म्हटले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यासोबतच महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयांचे फायर ऑडिट आणि वैद्यकीय उपकरणांचे सेफ्टी ऑडिट करण्यात यावे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

अमरावतीतील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील नवजात गहन चिकित्सा कक्षात (एनआयसीयू) सोमवारी पहाटे सुमारे ३.३० वाजता भीषण आग लागली. या अत्यंत दुःखद आणि दुर्दैवी घटनेत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला असून सुमारे सहा बालके जखमी झाली आहेत.

पहाटे साडेतीनच्या सुमारास वॉर्डातील एका व्हेंटिलेटरमध्ये कथित स्फोट झाल्यानंतर ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. आग लागताच कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णाल-यातील कर्मचाऱ्यांनी तातडीने मदत व बचावकार्य सुरू केले. दुर्घटनेच्या वेळी एनआयसीयू वॉर्डात सुमारे ३९ नवजात बालके दाखल होती. वॉर्डात आगीच्या ज्वाला आणि धूर पसरू लागल्यानंतर कर्मचाऱ्यांनी तत्काळ बालकांना बाहेर काढण्याचे काम हाती घेतले.

कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे अनेक बालकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असले, तरी तीन निष्पाप बालकांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेत जखमी झालेल्या सुमारे सहा बालकांना पुढील उपचारासाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अतीक अहमदच्या मुलाला उच्च न्यायालयाचा मोठा धक्का

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
प्रयागराज

अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून माफिया अतीक अहमदचा मुलगा मोहम्मद उमर याला मोठा धक्का बसला आहे. उच्च न्यायालयाने मोहम्मद उमरचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. अतीक अहमदचा फायनान्सर असलेला बिल्डर मोहम्मद मुस्लिम याने दिलेल्या तक्रारीवरून मोहम्मद उमर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला होता.

या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती अवनीश सक्सेना यांच्या एकेरी खंडपीठाने (सिंगल बेंच) सोमवारी मोहम्मद उमरचा जामीन अर्ज फेटाळण्याचा निर्णय दिला.

या प्रकरणात २६ एप्रिल २०२३ रोजी खुल्दाबाद पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आली होती.

ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ यास्मिन शेख यांचे निधन

साहित्य, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पुणे

ज्येष्ठ मराठी लेखिका, प्राध्यापिका आणि प्रसिद्ध व्याकरणतज्ज्ञ यास्मिन शेख यांचे सोमवारी पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. त्या १०१ वर्षांच्या होत्या. वयोमा-नानुसार उद्भवलेल्या आरोग्याच्या समस्यांमुळे त्यांचे निधन झाले.

यास्मिन यांचा जन्म २१ जून १९२५ रोजी एका ज्यू कुटुंबात झाला होता. त्यावेळी त्यांचे नाव जेरुशा रूबेन असे होते. त्यांनी पुण्यातील एसपी कॉलेजमधून कला शाखेत पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी शिक्षण आणि मराठी भाषेच्या क्षेत्रात प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदान दिले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक लेखक, विद्वान आणि भाषातज्ज्ञांनी त्यांच्या निधनावद्दल शोक व्यक्त केला.



प्राध्यापिका म्हणून प्रदीर्घ सेवा

यास्मिन यांनी छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद कॉलेज आणि मुंबईच्या सायन येथील एसआयईएस कॉलेजमध्ये मराठीच्या प्राध्यापिका म्हणून आपली सेवा दिली. त्यांनी प्रदीर्घ काळ विद्यार्थ्यांना मराठी भाषा आणि साहित्याचे शिक्षण दिले आणि आपल्या कार्यातून विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांना प्रभावित केले.

गिनीच्या राजधानीत कचऱ्याचा डोंगर कोसळून भूस्खलन; २२ जणांचा मृत्यू

गोवन वार्ता ■ कोनाक्री : गिनीची राजधानी कोनाक्री येथील सर्वांत मोठ्या 'दार एस सलाम' या कचरा डम्पिंग ग्राऊंडवर रविवारी पहाटे कचऱ्याचा भलामोठा डोंगर कोसळून भीषण भूस्खलन झाले. या दुर्दैवी दुर्घटनेत आतापर्यंत किमान २२ जणांचा मृत्यू झाला असून परिसरात मोठी हानी झाली आहे.

कोनाक्रीमध्ये मुसळधार पाऊस पडत होता, ज्यामुळे कचऱ्याचा प्रचंड ढीग वाहू लागला आणि भूस्खलनाची आपत्ती ओढवली. या दुर्घटनेमुळे लँडफिलच्या आजूबाजूला असलेल्या झोपड्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली पूर्णपणे गाडल्या गेल्या.

राशीभविष्य

मेष – आजचा दिवस फारसा आपणास अनुकूल नाही.आपण आपल्या जीवनाकडे फार सकारात्मक दृष्टीने बघणार नाही. कोणत्याही क्षेत्रात नुसते अंदाजावरुन काम करू नका.

वृषभ –आजचा दिवस आपणास आनंदाचा आहे मैत्रीचे संबंध वाढणार आहेत अनेकांना आपला सहवास हवाहवासा वाटणार आहे. कार्यक्षेत्रामध्ये आर्थिक लाभ होतील.

मिथुन –आपला स्वभाव जुळून घेण्या चा आहे. समोरच्याकडून आपल्याला काय फायदा आहे याचे आकलन आपल्याला निश्चितच चांगले होते.

कर्क –आपली निर्णय घेण्याची क्षमता आणि तारतम्य भाव जाणण्याची क्षमता अतिशय उत्तम आहे. त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रात उत्तम निर्णय होणार आहेत.

सिंह –आज आपल्याला आपला आत्मविश्वास कमी झाल्यासारखा वाटणार आहे पण सकारात्मक विचार आणि कामात व्यग्र ठेवणे आवश्यक आहे. जोडीदाराचे सहकार्य मिळेल.

कन्या – आपल्या कार्यक्षेत्रात छोटे मोठे बदल होण्याची शक्यता आहे. ते आपणासाठी लाभकारक आहेत. भागीदाराच्या व्यवसायात आपणास चांगला फायदा होणार आहे.

तुळ – व्यवसायासाठी आपणास कर्ज हवे असल्यास ते आपणास मिळू शकते.आज आपणाला जास्त काम असणार आहे. हाताखालील व्यक्तींची मदत घ्यावी लागणार आहे.

वृश्चिक –वैवाहिक जीवनासाठी आजचा दिवस अतिशय अनुकूल आहे. संतती कडून तुमच्या अपेक्षा पूर्ण होतील. लेखक कवी यांच्या लिखाणाची प्रशंसा होईल. विद्यार्थ्यांना शैक्षणिक यश मिळेल.

धनु – कुटुंबामध्ये एकोपा राहील याची आपण काळजी घेणार आहात. घरातील महत्त्वाच्या व वस्तूंची खरेदी विक्री होण्याची शक्यता आहे. त्यात आपणाला फायदा मिळेल.

मकर – नातेवाईकांशी संबंध चांगले ठेवण्याचे प्रयत्न करा. आपला व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टिकोनातून चांगले संदेश मिळणार आहेत. त्यादृष्टीने कामाचे नियोजन चांगल्या प्रकारे कराल.

कुंभ – आपले महत्त्वाचे कार्य आज सहजरीत्या होणार आहात.घरातील वातावरणही आनंदी असणार आहे. घरातल्यांचे सहकार्य आपणास मिळणार आहे.

मीन – दीर्घकालीन योजना तूर्तास थांबून ठेवा. आपल्याकडे जे उत्पन्नाचे स्त्रोत आहेत त्यातूनच उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करा. शक्यतो प्रवास टाळणे चांगले. दुसऱ्या वर जास्त विश्वास ठेवू नका.

अमेरिकेला पाठिंबा दिल्यास 'युद्धाची कृती' मानली जाईल

इराणची इतर देशांना थेट धमकी

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
तेहरान

इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असून दोन्ही देशांकडून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरूच आहेत. अमेरिकेच्या नव्या कठोर आर्थिक पावलांना कोणत्याही देशाने पाठिंबा दिल्यास ती थेट 'युद्धाची कृती' मानली जाईल, असा इशारा इराणच्या सर्वोच्च सुरक्षा संस्थेच्या नव्या प्रमुखांनी रविवारी दिला. तसेच अमेरिकेचे निर्बंध असेच सुरू राहिल्यास आखातातून कुठेही खनिज तेलाची निर्यात होऊ दिली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

दोन्ही देशांमधील हा संघर्ष टाळण्यासाठी समेट घडवून आणण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. चर्चेची प्रक्रिया नव्याने सुरू करण्यासाठी मध्यस्थ म्हणून पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर सोमवारी इराणला गेले.

अलीकडेच एका इराणी प्राधि-करणाने अशा डझनभर जहाजांची यादी तयार केली असून भविष्यातही त्यांच्या वाहतुकीवर बंदी कायम ठेवली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

जयशंकर यांनी घेतली पुतीन यांची भेट

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
मॉस्को

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी मॉस्को येथे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली. नवी दिल्लीतील 'ब्रिक्स' शिखर परिषदेत त्यांचे स्वागत करण्यासाठी भारत सज्ज असल्याचे सांगितले.

आपल्या चर्चेची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छांसह करत असल्याचे सांगत, दोन्ही देशांमधील आंतर-सरकारी आयोगाच्या बैठकीनंतर एक चांगला अहवाल सादर करण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी स्पष्ट केले.

परराष्ट्र मंत्र्यांसोबतच्या बैठकीत पुतिन यांनी पंतप्रधान मोदींना आपल्या शुभेच्छाही दिल्या.

नागीलि उपद (६७०१)

थो	क्या	चा	इ	श्ा	र		मु	ब	ई
का		ल			हु		गी	ता	
दा		री		पा	टी	ल		सा	रा
य		त	न	य		व	सा		डा
क	स		ग	री	ब		मा	क	ड
	का	रु	ष्ण			अ	न्य	था	
वा	र			स	ल	ग		का	म
द	ण	द	गी	त			च	र	क
ळी		जे		त	प	फ	ण		र

आडवे शब्द – १) एक आंबटगोड फळ, ७) तोंडदेखला, ९) आरक्षित, १०) लुडबुड्या, १२) कारस्थानी, १४) किनारा, १५) एक प्राचीन भाषा, १६) आयुर्मान, १७) पोथीनिष्ठ; सनातनी, १८) पेच, १९) आविर्भाव, २१) उमाळा; प्रेम, २२) अव्यवस्थित, २३) चपळाईने व वेगाने, २५) रसमय, २७) गावंढळ; एक लेंगभाजी, ३०) दिशा बदलणे, ३१) घोटाळा.

शब्दवेध (६७०२)

1		2	3	■	4	■	5	■	6
	■	7		8		■	9		
10	11		■	12		13		■	
14		■	15		■	16		■	
■	17			■	18		■	19	
20	■	■	21			■	22		
23		24		■	25	26			■
	■	27		28	■		■	■	29
30			■	31					

उभे शब्द – १) अतिशय, २) दादला, ३) बरोबरी, ४) आधीचा, ५) पराभव, ६) सुमारे, ८) द्रौपदी, ११) व्यसन, १३) धोका आहे किंवा नाही, हे सांगणारे निशाण, १५) लकडा, १८) घडण, १९) आचरण, २०) समावेश, २२) मारुतीचे शस्त्र, २४) टिकणे, २६) कारण, २८) मस्ती, २९) अग्नि; कळस.

(उत्तरः पुढील अंकात)

Village Panchayat Kirlapal-Dabal, Dharbandora
Ref. No. VPKD / DHR / 2026-27 / 1944 Date: 24.08.2026
QUOTATION NOTICE
Sarpanch of Village Panchayat Kirlapal-Dabal invites sealed quotations from the interested and experienced contractor/ agencies for "Cutting of Road Side Bushes" within Jurisdiction of Village Panchayat Kirlapal Dabal upto 12.00 p.m. on 02/09/2026 in the Office V.P. Kirlapal-Dabal.
Scope of Work
Cutting of Roadside Bushes in V.P. Jurisdiction
Terms and Conditions
1. The contractor shall visit the site and assess the work before quoting. 2. The quotation should clearly mention rate per running meter/ feet and total estimated amount. 3. Work should be complete within 15 days from the date of work order. 4. The contractor shall be responsible for disposal of silt at an approved location
Received Quotation will be opened on 02/09/2026 at 12.30 p.m. in V.P. office. The lowest quotation shall be accepted. Payment shall be in cheque after completion of the work. The right to accept or to reject one or all quotations without assigning any reasons thereof has been reserved by undersigned.
Sd/- (Sarpanch)
V. P. Kirlapal Dabal, Dharbandora

VILLAGE PANCHAYAT CURTI - KHANDEPAR
Ponda, Goa
Ref. No. VP/CC /2026-27 / 2565 Date : 26.08.2026
QUOTATION NOTICE
The Sealed quotations are hereby invited by Sarpanch of Village Panchayat Curti Khandepar from interested Supplier / Agencies / Dealer etc for Supply of PP Mesh Storage Bags (22" × 40") with drawstring. The sealed quotation shall reach this office of Village Panchayat Curti Khandepar on or before 07/09/2026 upto 11.00 am. The same shall be opened on 07/09/2026 at 12.30 pm at V.P Curti Khandepar Sub Office Curti of Village Panchayat Curti Khandepar.
Terms & Conditions
1.The dealer should be registered Authorised Supplier /Agencies/Dealers
2.That the said items to be delivered within 2 days from the date of supply order failure to which order will be cancelled and will be validly considered for 2nd lowest supplier or the supplier who fulfils the supply order within stipulated period
3.The dealer should have Sales tax/ TIN/CGST/SCGST registration certificate
4.The quotation or application will be rejected on non-compliance of above referred conditions
The Panchayat reserves the right to accept or reject one or all quotations without assigning any reason thereof Sd/- Sarpanch
Village Panchayat Curti Khandepar

MANAPPURAM FINANCE LTD.
CIN:L65910KL1992PLC006623.
Registered Office:W-4/636A, Manappuram House, P.O. Valapad,Thrissur-680567, Kerala, India
निलामी सूचना
विशेषकर दिल्लीकर्जदारों और सामान्य रूप में जनता को एतद्द्वारा सूचित किया जाता है कि निम्नलिखित अकाउंट्स में रखे गए सोने के आभूषणों की सार्वजनिक नीलामी निम्नलिखित शाखाओं पर दिनांक 16/09/2026 को सुबह 10.00 बजे से किया जाएगा. हम ऐसे डिफॉल्टर ग्राहकों के सोने के आभूषणों की नीलामी करने जा रहे हैं जिन्होंने सिक्योरिटी पत्र द्वारा सूचित किए जाने के बावजूद अपने लोन की राशि नहीं चुकाई है. लिन आउटस्टैन्ड की नीलामी नहीं हो पाएगी, उनकी नीलामी किसी अन्य दिन बिना पुनः सूचना दिए की जाएगी. नीलामी के स्थान व तिथि (अगर कोई हो) में परिवर्तनों की कोई सूचना नीलामी फेल्ड या डेफरॉल्ट पर लगाई जाएगी तथा इस बारे में कोई अन्य सूचना नहीं दी जाएगी.
विवरण का सूची
ऋण संख्या, नाम/सह ऋणी, 0121870710056740, सान्वयुलिम , 0124760710047762, दक्षिण गोवा, क चेरिंग मुख्य रस्ता गोवा, 0125170710027265, 0101, 0102, 0104, वास्को द गामा, 0124400710065726, 5777, 5792.
एतदर्थ नीलामी में भाग लेने के इच्छुक व्यक्तियों को निम्नलिखित का पालन करना होगा :- इच्छुक बोलीदाताओं को ईएमडी के रूप में रु.10,000/- नीलामी के दिन नकद जमा कराना होगा (असफल बोलीदाताओं को बाद में लौटा दिया जाएगा). बोलीकर्ता को वैध पहचान प्रमाण/पैन कार्ड साथ लेकर आना होगा. अधिक जानकारी के लिए कृपया 7903654576 पर संपर्क करें
अधिकृत अधिकारी
मनप्पुरम फाइनेंस लि. गोवा

शुद्धिपत्रक
'ब्लू नाईल को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.' द्वारे **'गोवन वार्ता'** या वर्तमानपत्रात ३०.०७.२०२६ रोजी पान क्र. ७ वर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संदर्भात हे शुद्धिपत्रक आहे. त्यामध्ये सोसायटीचे नाव दोनदा नमूद केले आहे; ते नाव 'ब्लू नाईल को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.' ऐवजी 'ब्लू नाईल अपार्टमेंट वांद्रे को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.' असे वाचावे.

CHANGE OF NAME
I, **AMISHA LACERDA,** w/o Arvind Lacerda, r/o Sanjeev Appts, F. No. F-1, Nr. Loyola School, Comba, Margao, Salcete, South Goa, 403601, holding Indian Passport bearing no. **N1896139**, would like to correct my name on the Passport from **AMISHA SAHINATH KADNEKER** (old) to **AMISHA LACERDA** (new) and also my address from **195, Francisco Pereira Vaddo Utorda, Salcete, South Goa, 403713** (old) to **Sanjeev Appts, F. No. F-1, Nr. Loyola School, Comba, Margao, Salcete, South Goa, 403601** as per aadhaar card.
Hereinafter, the above corrected name and address shall be used in all future dealings, documents and correspondences.
Sd/- AMISHA LACERDA

आयटीआय गोल्ड लोन्स लिमिटेड
(द इन्फ्रास्ट्रक्टर ट्रस्ट ऑफ इंडिया लिमिटेड समूहाचा एक भाग)
आयटीआय हाऊस, 36, डॉ. आर. के. शिरोडकर रोड, परळ, मुंबई 400 012
सुवर्ण तिलाव सूचना
संबंधित कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या खात्यांअंतर्गत तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा जाहीर लिलाव, खाली दिलेल्या लिलाव केंद्रांवर 28 सप्टेंबर 2026 रोजी (शुक्रवारी) सकाळी 11 पासून आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.
ही लिलाव प्रक्रिया अशा कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांची आहे ज्यांनी नोंदणीकृत पत्ताद्वारे सूचना देऊनही कर्जाची रक्कम भरलेली नाही. लिलावाचे ठिकाण किंवा तारीख यामध्ये काही बदल झाल्यास, त्याची माहिती लिलाव केंद्र आणि कंपनीच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल. ज्या वस्तूंचा लिलाव होणार नाही, त्यांचा लिलाव त्यानंतरच्या कामकाजाच्या दिवसांत केला जाईल; तत्पूर्वी त्यांचा तपशील कंपनीच्या संकेतस्थळावर आणि लिलाव केंद्रावर प्रदर्शित केला जाईल. 28 सप्टेंबर 2026 रोजी (शुक्रवारी) सकाळी 11 पासून लिलाव केल्या जाणाऱ्या तारण ठेवलेल्या वस्तूंची यादी.

लिलाव केंद्र	
मडगाव	
लिलाव केंद्राचा पत्ता	
आयटीआय गोल्ड लोन्स लिमिटेड, दुकान क्र.३, तळमजला, चर्चला लागेंद्र, पेज वॅलेच्या जवळ, कॉंद, मडगाव, गोवा - 403601	
कर्ज खाते क्र.	
GL26030231978	GL26030228406
GL26030221305	GL26030228389
GL26030221307	GL26030231551
GL26010190181	GL26030231267
GL26030218975	GL26030233086
GL26030218978	GL26030219691
GL26030224715	GL26020211178
GL26020212683	GL26030223467
GL26030221206	GL26030223468
GL26030220838	GL26030217022
GL26030220840	GL26030223368
GL26030222090	GL26030226718
GL26030219058	GL26030229486

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा.
श्री. प्रजीश के - 8898980202
आयटीआय गोल्ड लोन्स लिमिटेडसाठी
अधिकृत अधिकारी
(पूर्वीची युनायटेड पेट्रो फायनान्स लिमिटेड)

Change in Name
I, **Magdalena Elva Fernandes** D Cunha resident of h.no 219, Palolem, Canacona, south Goa, declare that I has changed my Name from **Magdalena Elva Fernandes D Cunha** to **Magdalena Elva Fernandes.**
Henceforth, I will be known as **Magdalena Elva Fernandes** in all my documents, proceedings and dealings.

Change in Name
I, **LALAN SHANKAR SAWANT** ,R/o H/No. GOLDEN HERITAGE Flat No. 106,Dhavali opp. Power Max Gym Ponda Goa 403401 Holder of Indian Passport No.P3863526 I hereby declare that Lalan k. Naik and Lalan Shankar Sawant is one and the same person. If anybody has any objection they should inform to Passport Office within 15 days from the Publication of this Notice
Sd/-
Lalan K. Naik

Shree Devi Bhagawati Panchayatan Devasthan
Tuem, Pernem - Goa
Rg.N.G449, Dt.1/9/1955
Ref: SDBPD/TUEM/2026 Date: 25/08/2026
NOTICE
That this is for the kind information of the Registered Mahajans of Shree Devi Bhagawati Panchayatan Devasthan Tuem, Pernem, Goa, that an Annual General Body meeting of the Mahajans is fixed on Tuesday 15th September 2026 at 10:30 am in the premises of Shree Bhumipurush Temple, Tuem, Gaonkar Wada, as per the Devasthan Regulation Act in force.
Following is the Agenda:
1. To Read & Confirm the minutes of the last Annual General Body Meeting held.
2. Presentation of accounts for the year 2025-26.
3. To review and discuss the work done during the year 2025-26.
4. Planning for new Shree Devi Satteri Mandir.
5. Extending the period for one of the tenderer of coconut tree garden, as he has done developmental work with his own expenditure.
6. If any point or subject arises, to take for discussion with the permission of President during meeting.
That in the event of lack of quorum the above meeting shall be held at 11:00 am on the same day at the same place.
All the Mahajans are requested to remain present and participate in the proceedings.
SEAL
Sd/- (D.T. Naik)
Secretary

PUBLIC NOTICE
Public is hereby informed that my client **MRS. PRIYA FERNANDES**, has lost her original DEED OF SALE dated 16/08/1991 between FR. JOSEPH CAETANO D'SILVA, MISS OCTAVIA D'SILVA, MRS. ELSA FURTADO E SILVA, MR. AGNELO D'SILVA, MISS. ENA D'SILVA, MRS. LITA VERONICA SOARES E SILVA, SHRI. ALVARO SILVA, and MR. ROMUALDINO FERNANDES registered in the Office of the Sub Registrar of Salcete under No 1520 At Pages 523 to 531 of Book I, Volume No 200 dated on 13-12-1991 in respect of her property surveyed under Survey No. 129/2B of Ambelim Village of Salcete Taluka. Accordingly, the Police Inspector of Margao Town Police Station had issued missing article acknowledgment dated 21/08/2026 bearing No. 1868/2026.
Any person(s) who finds or receives the said Deed of Sale shall report to the undersigned within 10 (ten) days from the date of publication of this notice, as possession of the said Deed of Sale by any person shall be considered illegal.
The general public, banks, and financial institutions are hereby requested and informed not to deal with any person claiming any interest in the said property, or any part thereof, whether by way of leave and license, co-ownership, agreement, Memorandum of Understanding, or otherwise, based on the said Deed of Sale. Any such transaction shall be without the consent of my client and shall be treated as sham and void and shall not be binding on my client in any manner whatsoever.
Sd/-
Aquita Swizel Barreto
Advocate
F-2, First Floor, Grace Heritage (Cross Side), Opposite Noble Pharmacy, Fatorda, Salcete, Goa.
Contact No. 7887923573, Email id: bensongoelegal@gmail.com

पोंबुर्फा-ओळावली ग्रामपंचायत
बार्देश – गोवा
दूरध्वनी क्र.0832.2295244 ईमेल: *pomburpa-vpsec.goa@nic.in*
संदर्भ: ग्रामपंचायत/पोंबुर्फा-ओळावली/2026-2027/968 दिनांकित: 19-8-2026
क्वोटेशन सूचना
सरपंच यांनी पोंबुर्फा-ओळावली ग्रामपंचायतीच्या वतीने खाली नमूद केलेल्या वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अनु.क्र.	आयटम	नग
1	पंचायत कार्यालयासाठी ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग सुविधेसह आयपी-आधारित सीसीटीव्ही निरीक्षण प्रणालीचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वितीकरण; यामध्ये ऑडिओ रेकॉर्डिंग सुविधेसह 3 आयपी सीसीटीव्ही कॅमेरे, नेटवर्क व्हिडिओ रेकॉर्डर (एनव्हीआर), सर्व्हिलन्स-ग्रेड हार्ड डिस्क, पंचायत बैठकीच्या कामकाजाचे स्पष्ट रेकॉर्डिंग करण्यासाठी बाह्य/कॉन्फरन्स माइक्रोफोन, पीओई स्विच, यूपीएस, सीएटी६ केबलिंग आणि सर्व आवश्यक उपकरणांचा समावेश असून ही प्रणाली सर्व दृष्टीने पूर्ण असेल.	3

1. दरपत्रके पोंबुर्फा-ओळावली ग्रामपंचायतीच्या कार्यालयात दिनांकित 04-09-2026 रोजी सकाळी 10.30 पूर्वी किंवा त्यापूर्वी पोहोचणे आवश्यक आहे.
2. प्राप्त झालेली दरपत्रके 04-09-2026 रोजी सकाळी 11 वाजता ग्रामपंचायतीच्या बैठकीत उघडली जातील.
3. सर्वांत कमी दराचे दरपत्रक स्वीकारले जाईल.
4. वर नमूद केलेल्या तारखेनंतर प्राप्त झालेली किंवा अपूर्ण असलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
5. प्राप्त झालेली कोणतीही किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार पोंबुर्फा-ओळावली ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

डीआय/जाहिरात/1279/2026